# अक्षर वाङ्‌मय

वर्ष तेरावे, पुरवणी अंक ४, खंड. १

फेब्रुवारी २०२३



मुख्य संपादक

डॉ. नानासाहेब सुर्यवंशी

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

# अक्षर वाङ्मय

**फेब्रुवारी 2023**

**वर्ष तेरावे, पुरवणी अंक ४, खंड. १**

संपादक
**डॉ. नानासाहेब सूर्यवंशी**

कार्यकारी संपादक
**डॉ. शिवाजीराव देशमुख**

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन
'प्रणव' रुक्मिणी नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५

मुद्रक: श्री. जे प्रिंटिंग प्रा लिमिटेड **१४१६** सदाशिव पेठ पुणे- **४११०३०**

**साहित्य व वर्गणी पाठवण्याचा पत्ता**: डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
'प्रणव' रुक्मिणी नगर, थोडगा रोड, अहमदपूर,
जि. लातूर, ४१३५१५
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com

वार्षिक वर्गणी: रु ५००/-
द्विवार्षिक वर्गणी : रु ९००/-
पंचवार्षिक वर्गणी : रु **२०००**/-
अंक मूल्य : रु १२५/-

- महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ या नियतकालकाच्या प्रकाशनात अनुदान दिले असले तरी या नियतकालिकेतील लेख लेखांच्या विचाराशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

- या अंकातील लेखातून व्यक्त झालेले लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असं नाही.

| | | |
|---|---|---|
| 44 | Globalisation and Sanskrit literature (with special reference to KautiliyaArthashastra)<br>**Prof. Dr. Rushikesh Kale** | 159-162 |
| 45 | जागतिकीकरण आणि संस्कृत : एक अभ्यास<br>**डॉ. मृणालिनी आबासाहेब शिंदे** | 163-167 |
| 46 | प्रभाकर भातखंडेंच्या 'इति मानवीयम्' नाटकातील तंत्रज्ञानाचे चित्रण<br>**रुपाली रघुनाथ वाडेकर** | 168-169 |
| 47 | प्राचीन-संस्कृत-ग्रन्थेपुवर्णितं जलविज्ञानम्।<br>**श्री.आनंद दुष्यंतराव रत्नपारखे** | 170-174 |

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

# जागतिकीकरण आणि संस्कृत : एक अभ्यास

**डॉ. मृणालिनी आबासाहेब शिंदे**
संस्कृत विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड मो.नं. ९८५०३०५६२६
**Email-** mrunalinisanskrit@gmail.com

**प्रस्तावना:**

साहित्य समाजाचा आरसा असतो. भाषा ही साहित्याला निर्माण करीत असते आणि भाषेच्या समृद्धीवर साहित्याची समृद्धी अवलंबून असते. भाषेची परंपरा गौरवशाली असेल, तरच साहित्य गौरवशाली परंपरा प्राप्त करू शकते. गौरवशाली परंपरा असणारे साहित्य समाजाच्या जडणघडणीत महत्वाची भूमिका बजावते. समाजाची जडणघडण व्यवस्थित झाली की, देशाचा सर्वांगीण विकास साधणे सोयीस्कर होते. त्यासाठी भाषा ही अखंडित प्रवाही आणि लवचिक असणे गरजेचे आहे. संस्कृतभाषा प्राचीन भाषा आहे. तसेच ती संदर्भभाषा आणि ज्ञानभाषा आहे. तिने विविधप्रकारच्या विपुल साहित्याची निर्मिती केलेली आहे. तिने जगाला अक्षर वाङ्मय दिलेले आहे. अशी ही संस्कृतभाषा सुरस, सुबोध, विश्वमनोज्ञ, ललित, रमणीय आहे. ती अमृतवाणी आहे. म्हणूनच जागतिकीकरणाच्या रेट्यात संस्कृतचे स्थान, त्याची भूमिका, महत्त्व जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केलेली आहे.

**उद्दिष्टे-**

1) जागतिकीकरण संकल्पनेचा अभ्यास करणे.
2) संस्कृत एक भाषा, विषय, साहित्य म्हणून त्याचे अध्ययन करणे.
3) जागतिकीकरणात संस्कृतसाहित्यनिर्मिती आणि प्रसारप्रचारामध्ये योगदान देणाऱ्या आधुनिक संप्रेषणतंत्रज्ञानाचा अभ्यास करणे.
4) जागतिकीकरणात भाषा, विषय, साहित्य म्हणून संस्कृतचे असणारे महत्त्व स्पष्ट करणे.
5) संस्कृतची उपयुक्तता स्पष्ट करणे.

**व्याप्ती-** प्रस्तुत विषयाची व्याप्ती जागतिकीकरणात संस्कृत एक भाषा, विषय आणि साहित्य म्हणून असणारे त्याचे स्थान, भूमिका, महत्त्व, उपयुक्तता स्पष्ट करण्यापुरतीच मर्यादित आहे.

**महत्त्व-**

संस्कृतभाषा ही प्राचीनभाषा आहे. तिला वैभवसंपन्न अशी गौरवशाली परंपरा आणि संस्कृती आहे.

द्यौः शान्तिरन्तरिक्षं शान्तिः पृथिवी शान्तिरापः शान्तिरोषधयः शान्तिः |
वनस्पतयः शान्तिर्विश्वे देवाः शान्तिर्ब्रह्म शान्तिः सर्वं
शान्तिः शान्तिरेव शान्तिः सा मा शान्तिरेधि ||[१]

आत्मकल्याण, व्यक्तिकल्याण कुटुंबकल्याण, समाजकल्याण, विश्वकल्याण हे तिचे ध्येय आहे. तिने कथा, नाटके, आर्षकाव्ये, महाकाव्ये,ऐतिहासिककाव्ये,मुक्तककाव्ये,रसायनशास्त्र,शिक्षणशास्त्र,विमानशास्त्र,योगशास्त्र,तंत्रशास्त्र,संगीतशास्त्र,कृषिशास्त्र,धर्मशास्त्र,साहित्यशास्त्र,नाट्यशास्त्र, कामशास्त्र, राज्यशास्त्र, गणितशास्त्र, शिल्पशास्त्र, अर्थशास्त्र, वास्तुशास्त्र, पाकशास्त्र, भाषाशास्त्र, आयुर्वेद, व्याकरण, वैदिकवाङ्मय, दर्शने असे विविधप्रकारचे साहित्य निर्माण केलेले आहे आणि आजही करीत आहे. म्हणून जागतिकीकरणात संस्कृतचे स्थान, भूमिका, महत्व काय आहे, हे दिग्दर्शित करणे गरजेचे आहे.

**संशोधनपद्धती-** प्रस्तुत विषयाची संशोधनपद्धती वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे.

**विषयविवेचन-**

जागतिकीकरण म्हणजे स्थानिक वस्तूंची किंवा घडामोडींची जागतिक स्तरावर स्थानांतराची प्रक्रिया. विसाव्या शतकाच्या शब्दकोशानुसार जागतिकीकरण म्हणजे जगभर पसरणे, एकाच वेळी संपूर्ण जगाचा वा जगातील सर्व लोकांचा विचार करणे, त्यात व्यापार, विदेशी थेट गुंतवणूक, भांडवल, प्रवाह, प्रवास आणि तंत्रज्ञान यांच्या प्रसारमाध्यमाने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी खुले केले जाते. डॉ. यशवंत मनोहर यांच्या मते जागतिकीकरण म्हणजे जगातील वेगवेगळया देशांनी परस्पर व्यापार करणे होय.[२]

भारतात १९९० च्या सुमारास जागतिकीकरणाला प्रारंभ झाला.[३] जागतिकीकरणात व्यापाराच्या दृष्टीने राष्ट्रांच्या सीम इतक्या फिकट होत गेल्या की, व्यापाराच्या दृष्टीने स्थलांतरण आणि भांडवलाचे मुक्त वहन होऊ लागले, जागतिकीकरण दळणवळण आणि तंत्रज्ञानाने इतके वेगवान होत गेले की, आता ते रोखणे अशक्य झाले आहे.

जग ही एक बाजारपेठ असणे, जागतिकीकरणाचे ध्येय आहे.[४] त्यात प्रत्येक देशाने टिकणे महत्त्वाचे आहे, म्हणू जागतिकीकरण म्हणजे काय? त्याचा समाजजीवनावर काय, कसा परिणाम होतो? त्याचा संस्कृतभाषा, साहित्य, विष